# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. :- ०२०-२५६०११८९/११९०
फॅक्स नं. - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे-४११००७

संदर्भ क्र. आरक्षण/ओ २२/८३१

दिनांक - ८/८/२०१२

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय - शासकीय विभाग/कार्यालयातील गट अ ते गट ड संवर्गात पदभरती करताना संवर्ग व्यवस्थापन/ आर्थिक नियोजन व कामाचे नियोजन इ.बाबी लक्षात घेवून पदभरती करण्याकरिता मार्गदर्शक सूचना.

संदर्भ - शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दिनांक २५/७/२०१२.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शासकीय विभाग/कार्यालयातील गट अ ते गट ड मधील सरळसेवा कोटयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडत आहे. तरी सदर शासन निर्णयात उल्लेख केलेल्या तरतूदीनुसार पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही व्हावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सोबत - वरीलप्रमाणे.

सहायक कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

प्रत -

१) मा.उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष, पुणे विद्यापीठ, पुणे ७.
२) मा.उपकुलसचिव, प्रशासन शिक्षक कक्ष, पुणे विद्यापीठ, पुणे ७.

शासकीय विभाग/कार्यालयातील गट अ ते गट ड संवर्गात पदभरती करताना संवर्ग व्यवस्थापन/आर्थिक नियोजन व कामाचे नियोजन इ. बाबी लक्षात घेऊन पदभरती करण्याकरिता मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय, क्रमांक:एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक-२५.७.२०१२.

वाचा

(१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.असंक-१०१०/प्र.क्र.१/२०१०/वित्तीय सुधारणा-१, दि.५.६.२०१०.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि-२०१०/प्र.क्र.८३/१०/वित्तीय सुधारणा-१, दि.२९.११.२०१०.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि-२०११/प्र.क्र.११०/११/वित्तीय सुधारणा-१, दि.३०.६.२०११.

प्रस्तावना :-

शासकीय विभाग/कार्यालयातील गट क व गट ड मधील सरळसेवा कोटयातील रिक्त पदे भरण्यावर संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये निर्बंध घातले होते. तसेच त्यासंदर्भात संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये सुधारित आदेश देण्यात आले होते. संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये पदभरतीवरील निर्बंधाचा कालावधी एक वर्षाकरिता वाढविला असून हा वाढीव कालावधी संपल्यानंतर निर्बंध उठविण्यात आल्याचे समजण्याबाबत आदेशात स्पष्ट केले आहे. सदर वाढीव कालावधी संपूष्टात आला असल्याने आता पदभरतीवर निर्बंध नाहीत.

२. शासकीय कर्मचाऱ्यांचा सरासरी सेवा कालावधी ३३ वर्षे होतो असे विचारात घेतल्यास सेवानिवृत्तीमुळे प्रतिवर्षी साधारणत: ३ टक्के इतकी पदे रिक्त होत असल्याचे दिसून येईल. यामुळे सध्याच्या रिक्त पदांमध्ये या वर्षी व पुढील वर्षी रिक्त होणारी पदे विचारात घेतल्यास रिक्त पदांचे प्रमाण निश्चितच जास्त असेल. पदभरतीवरील निर्बंध आता संपूष्टात आले असल्याने प्रशासकीय विभाग, विभागप्रमुख यांच्याकडून सरसकट सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात येण्याची शक्यता आहे. पदभरतीवर काही कालावधीसाठी निर्बंध घालणे व ते निर्बंध शिथिल केल्यावर सर्व रिक्त पदे एकाच वेळी भरणे यामुळे खालील अडचणी निर्माण होतील व ते प्रशासकीयदृष्टया गैरसोयीचे होईल.:-

(१) एकाच वेळेस सर्व पदे भरल्यास नियुक्त होणाऱ्या उमेदवारांची संख्या जास्त असते व त्या तूलनेने पदोन्नतीची पदे कमी असल्याने एकाच बॅचमधील सर्व कर्मचाऱ्यांना एकाच वेळेस पदोन्नती मिळत नाही.

काही वेळा एकाच बॅचमधील ज्येष्ठ कर्मचाऱ्यांना आधी पदोन्नती मिळते व कनिष्ठ उमेदवारांना फार उशिरा (३-४ वर्षानंतर) पदोन्नती मिळते व त्यामुळे कनिष्ठ कर्मचाऱ्यांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होते.

(२) पदभरतीवर निर्बंध नसल्याने सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही एकाच वेळेस सुरु केल्यास शासनास अपेक्षित असलेल्या गुणवत्तेचे उमेदवार निवडले जाणार नाहीत व कमी गुणवत्तेचे उमेदवार देखील निवडले जाऊ शकतील.

(३) शासन सेवेत सर्व संवर्गात पदोन्नतीकरिता निम्न पदावर किमान ३ वर्षे (अथवा सेवाप्रवेश नियमात त्यापेक्षा जास्त कालावधी विहित केला असल्यास तेवढी वर्षे) नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे. सबब नियमितरित्या पदे भरल्यास विहित सेवा कालावधी पूर्ण करणारे उमेदवार प्रत्येक वर्षी उपलब्ध होऊ शकतील.

(४) पदभरतीवरील निर्बंध उठवल्यावर एकाच वेळी सर्व पदे भरण्याची कार्यवाही झाल्यास शासनावर फार मोठा आर्थिक भार पडेल. हा आर्थिक भार विभागला जावा व राज्याच्या अपेक्षित नैसर्गिक वाढीमध्ये (natural growth) हा आर्थिक भार सहन करणे शक्य व्हावे याकरिता सर्व रिक्त पदे एकाचवेळी न भरता प्रतिवर्षी काही प्रमाणात पदभरती करणे योग्य होईल.

(५) राज्य शासनाकडून जनतेच्या विकासासाठी विविध प्रकल्प/योजना सुरु करण्यात येतात. तथापि पदभरतीवरील निर्बधामुळे सदर प्रकल्प/योजनांचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रमाणात अधिकारी/कर्मचारी उपलब्ध होऊ शकत नाहीत. यामुळे काम पूर्ण करता येत नाही. परीणामी कामात खंड पडू शकतो, अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येऊ शकतो व प्रकल्प/योजना वेळेत पूर्ण करता येत नाहीत. याचा विकास कामावर प्रतिकूल परीणाम होतो, शिवाय प्रकल्प/योजनेवरील खर्चात वाढ होते. तसेच अधिकारी/कर्मचारी संघटनांकडूनदेखील रिक्त पदे भरण्याबाबत वारंवार मागणी होते.

३. गट अ ते गट ड मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्रशासकीय विभाग, विभागप्रमुख यांच्याकडूनकरण्यात येते. यानुसार पदभरती करताना, संवर्ग व्यवस्थापन/आर्थिक नियोजन व कामाचे नियोजन इ. बाबी लक्षात घेऊन पदभरती करण्याबाबत कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

४. शासन असे निदेश देत आहे की, शासकीय विभाग/कार्यालयातील गट अ ते गट ड मधील सरळसेवा कोटयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भातपुढील आदेश लागू राहतील. :-

(अ) गट अ ते गट ड मधील सरळसेवा कोटयातील पदांपैकी, मंजूर पदांच्या प्रतिवर्षी कमाल ३ टक्के इतक्या कमाल मर्यादेपर्यंतच रिक्त पदे विहित कार्यपध्दतीने भरण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यांना राहतील.

(ब) शासन निर्णय, वित्त विभाग, दि.२९.११.२०१० अन्वये स्थापन केलेल्या प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने यापुर्वीच शिफारस केली असल्यास त्यानुसार सन २०१२ मध्ये व पुढील वर्षी, तेवढया संख्येने गट क व गट ड ची रिक्त पदे भरण्यासंदर्भात, उचित स्तरावरुन मान्यता घेऊन आवश्यक कार्यवाही प्रशासकीय विभाग, विभागप्रमुख यांना करता येईल.

(क) गट अ ते गट ड मधील ज्या संवर्गात रिक्त पदांचा अनुशेष मोठया प्रमाणावर असून वरीलप्रमाणे विहित टक्केवारीपेक्षा जास्त प्रमाणात पदे भरण्याची तातडीची गरज आहे अशा बाबतीत रिक्त पदे भरण्यास मान्यतेचे प्रस्ताव प्रशासकीय विभागास पूर्ण समर्थनासह सादर करता येईल. असे प्रस्ताव तपासण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | पदनाम | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सेवा) सा.प्र.वि. | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | संबंधित प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव | निमंत्रित सदस्य |
| ५ | सह/उप सचिव (सेवा), सा.प्र.वि. | आमंत्रक |
| ६ | संबंधित प्रशासकीय विभागातील सह/उपसचिव | सदस्य-सचिव |

वरील समितीने प्रस्ताव तपासून पदभरतीसंदर्भात शिफारस केल्यास, प्रशासकीय विभागाने प्रभारी मंत्री व मा.मुख्यमंत्री महोदयांची मान्यता घेऊन त्याबाबतचे आदेश प्रथम काढणे आवश्यक राहील. त्यानंतर पदभरतीबाबत पुढील उचित कार्यवाही करता येईल.

(ड) प्रतिवर्षी भरावयाच्या विहितकमाल टक्केवारीच्या पदांमध्ये, अनुकंपाधारक उमेदवार व अतिरिक्त संवर्ग कक्षातून अन्य शासकीय कार्यालयात सामावून घेण्यात येणारे उमेदवार यांच्या नियुक्तीने भरण्यात येणारी पदे विचारात घेण्यात येऊ नयेत.

(इ) प्रतिवर्षी भरावयाची ३ टक्केची कमाल मर्यादा गडचिरोली जिल्हयातील गट क व गट ड मधील सरळसेवेच्या पदांसाठी लागू होणार नाही.

५. हे आदेश शासन अनुदानित संस्थांनादेखील लागू राहतील.

६. सर्व प्रशासकीय विभाग, विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख यांनी वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करुन रिक्त पदे भरण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१२०७२५१५०१०४०१०० आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(के.पी.बक्षी)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, विधानमडळ सचिवालय,
सर्व संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
*प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
*सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती)
ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोंकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१ योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई २० (५ प्रती)
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस. व्ही.पटेल रोड, मुंबई ४ (५ प्रती)
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस , वरळी, मुंबई १३ (५ प्रती)
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)
नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, , नरीमन पॉईंट, मुंबई २१ (५ प्रती)
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)
सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, निवड नस्ती.

*पत्राने.